**ठळक बातम्या**

● हवामान विभागानं नागरिकांचं जीवनमान सुलभ केल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे गौरवोद्गार

● प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्या मुंबईत नौदलाच्या ताफ्यात २ युद्धनौका आणि १ पाणबुडी समाविष्ट होणार

● सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मिक कराडवर मकोका दाखल

● खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना एकाच नियमावली अंतर्गत आणण्याची परिवहन मंत्र्यांची घोषणा

**आणि**

● राज्य सरकार यंदापासून राज्यस्तरीय महाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धा आयोजित करणार

**<><><><><>**

विज्ञानानं सर्वसामान्यांचं जीवनमान सोपं करावं आणि हवामान विभाग या कसोटीवर पात्र ठरत असल्याचे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं भारतीय हवामान विभागाच्या दीडशेव्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. देशातल्या ९० टक्के जनतेला हवामान विभागाच्या सुविधांचा लाभ होतो.

मागील १० दिवस आणि आगामी १० दिवसांच्या हवामानाची माहिती सामान्य नागरिकांना आता सहज मिळते, असं ते म्हणाले.

हवामानशास्त्र विभागाच्या शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त एका विशेष नाण्याचं अनावरणही त्यांनी केलं. हवामानाचा वेध घेण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली, वायूमंडलातल्या बदलांचा सूक्ष्म वेध घेण्याची क्षमता, अत्याधुनिक रडार आणि उपग्रह तसंच उच्च दर्जाची संगणक प्रणाली यांचा वापर यासाठी विभागाकडून मिशन मौसम हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. यातून हवामानाविषयी सखोल माहिती आणि हवेचा दर्जा नोंदवता येईल आणि त्याचा भावी काळातल्या हवामान व्यवस्थापन आणि संशोधनासाठी उपयोग होईल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी मिशन मौसमचा प्रारंभ केला.

**BYTE (pm-Future ready- 0 TO 24 Sec)**

हवामान अंदाज, हवामान व्यवस्थापन आणि हवामानबदलाचे दुष्परिणाम कमी करणे यासंबधीचं धोरण असलेल्या IMD विजन-२०४७ चं प्रकाशनही मोदी यांनी यावेळी केलं. भारताच्या हवामान विभागाने केलेल्या प्रगतीमुळे आपत्ती व्यवस्थापन क्षमता वाढल्याचा संपूर्ण जगाला लाभ झाल्याचं त्यांनी सांगितलं. फ्लॅश फ्लड तंत्रज्ञानामुळे नेपाळ, भूतान, बांग्लादेश, श्रीलंका यासारख्या शेजारी देशांना आगामी पूरपरिस्थितीबद्दल सावध करता आलं, असं मोदी यांनी यावेळी नमूद केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उद्या मुंबईत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या दोन युद्धनौका, तर आयएनएस वाघशीर ही पाणबुडी भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होईल. पहिल्यांदाच एकापेक्षा अधिक युद्धनौका आणि पाणबुडी एकाचवेळी नौदलाच्या ताफ्यात सहभागी होणार आहे.

निलगिरी ही स्टेल्थ फ्रिगेट प्रकारातली आणि सुरत ही विनाशक प्रकारातली युद्धनौका तसंच वाघशीर या स्कॉर्पियन श्रेणीतल्या पाणबुडीचा यात समावेश आहे. दोन्ही युद्धनौकांवर दिवसा आणि रात्री हेलिकॉप्टर उतरू शकतात आणि उड्डाण करू शकतात. महिला अधिकारी आणि जवानांना राहण्यासाठी या युद्धनौकांवर विशेष सोय आहे. माझगाव डॉकनं स्वदेशी बनावटीच्या युद्धनौका आणि पाणबुडी बनवली आहे.

याशिवाय, प्रधानमंत्री नवी मुंबईत इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिराचं उद्घाटनही करणार आहेत.

**<><><><><>**

पुण्यात साजऱ्या होणाऱ्या ७७व्या लष्कर दिनानिमित्त उद्या बॉम्बे इंजिनियरिंग ग्रुपच्या मैदानावर भव्य संचलन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर संध्याकाळी होणाऱ्या गौरवगाथा या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंग उपस्थित असतील. या कार्यक्रमात लष्कर पोलीस दल तसंच महाराष्ट्र एनसीसीचं महिला पथक सहभागी होईल.

तसंच, भारतीय लष्करात वापरल्या जाणाऱ्या शस्त्रास्त्रं तसंच उपकरणांचा समावेशही संचलनात होईल. या कार्यक्रमात प्रथमच नेपाळच्या लष्करी वाद्यवृंदही सहभागी होईल.

**<><><><><>**

खासगी पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना एकाच नियमावली अंतर्गत आणणार असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. या संदर्भात आज मंत्रालयात बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते.  प्रवासी सुरक्षा, कार पुलिंग, परवाना, ट्रॅफिक समस्या या संदर्भातली पारदर्शक तक्रार यंत्रणा तातडीने तयार करण्याचे निर्देशही सरनाईक यांनी दिले आहेत. सर्व प्रवासी वाहतूक पुरवठादार कंपन्यांअतर्गत चारचाकी, बाईक, टॅक्सी यांचा समावेश करण्यात येणार आहे, अशी माहिती देतानाच प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देणं, बाईक चालवण्यासाठी महिला चालकांना प्राधान्य देणं गरजेचं असल्याचंही सरनाईक यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण वाल्मिक कराड याच्यावर मकोका दाखल करण्यात आला आहे. तसंच कराड याचा ताबा एसआयटीकडे देण्याचा निर्णय न्यायालयने घेतला आहे. प्रोडक्शन वॉरंट दाखवून कराड याचा ताबा एसआयटीकडे दिला जाईल, असं सीआयडीचे पोलीस उपअधीक्षक अनिल गुजर यांनी सांगितलं.

खंडणी प्रकरणी वाल्मिक कराडला केज इथल्या न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. कराडला १४ दिवसांची कोठडी सुनावल्यानंतर **परळी** शहरात कराड समर्थकांनी टायर जाळून निषेध केला. या आंदोलनामुळे परळी शहरातल्या बाजारपेठा आज बंद होत्या. **आंदोलकांनी बसवर दगडफेक केल्यानं** परळी बस स्थानकामधून होणारी बस वाहतूक बंद करण्यात आली आहे. वाल्मिक कराड याच्या एका समर्थकानं अंगावर रॉकेल ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी या समर्थकाला ताब्यात घेतलं आहे.

वाल्मिक कराड याच्यावरचा गुन्हा मागे घ्यावा या मागणीसाठी त्याची आई **पारूबाई** कराड या बीड जिल्ह्यातल्या परळी इथं पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करत आहेत.

**<><><><><>**

बीड आणि परभणीतल्या घटना सरकार पुरस्कृत असून सरकार मुख्य आरोपींना वाचवायचा प्रयत्न करत आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भंडारा इतं वार्ताहरांशी बोलताना केला. दोन्ही घटनातल्या आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी पटोले यांनी केली.

**<><><><><>**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत यंदापासून प्रथमच राज्यस्तरीय महाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेचं आयोजन केलं जाणार आहे, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार

यांनी दिली आहे. तालीम, प्राथमिक आणि अंतिम फेरी अशा तीन टप्प्यात ही स्पर्धा होणार असून यातून नवे कलाकार उदयाला येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अंतिम फेरीतल्या विजेत्या तीन एकांकिकांना अनुक्रमे १ लाख, ७५ हजार आणि ५० हजार रुपयांचं पारितोषिक दिलं जाणार आहे. त्याचबरोबर उत्कृष्ट बोलीभाषा एकांकिकेसाठी ५० हजार रुपयांचं बक्षीस ठेवलं आहे. तसंच उत्कृष्ट दिग्दर्शन, प्रकाश योजना, नेपथ्य, रंगभूषा, संगीत दिग्दर्शन, वेशभूषा, अभिनय अशी बक्षीसंही दिली जाणार आहेत.

**<><><><><>**

संक्रांतीनिमित्त राज्यात ठिकठिकाणी पतंग उडवण्याचा खेळ रंगतो. घातक मांजाच्या वापरावर बंदी घालण्यात आली असून पोलीस आणि प्रशासनानं अनेक ठिकाणी कारवाई करुन नायलॉन मांजाचे साठे जप्त केले. नागपूर शहरात विविध कारवाईत जप्त केलेला सुमारे १८ लाख किमतीचा नायलॉन मांजा पोलीसांनी नष्ट केला. इतरत्रही पोलीस सजगपणे घातक मांजाविरोधात अभियान चालवत आहेत. **नाशिक** शहरात पाथर्डी फाट्या जवळ दुचाकीवरुन जाणाऱ्या २२ वर्षाच्या युवकाचा नायलॉन मांजाने गळा कापला गेला, आणि त्याचा मृत्यू झाला. **छत्रपती संभाजीनगरमधे** कर्तव्यावर निघालेल्या पोलीस उपनिरीक्षकाच्या गळ्यात नायलॉन मांजा अडकून तो जखमी झाला. त्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. **भंडारा** जिल्ह्यात लाखनी इथं काल उड्डाणपुलावरुन जाणारा दुचाकीस्वार नायलॉन मांजा गळ्यात अडकून गंभीर रीत्या जखमी झाला.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात देसाईगंज जवळ जुनी वडसा या गावात एक शेतकरी वाघाच्या  हल्ल्यात जखमी झाला. जखमी शेतकऱ्याला ग्रामीण रुग्णालयात भरती करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

गोंदिया शहरानजीकच्या भानपूर जंगल क्षेत्रात आज एक वाघ मृतावस्थेत आढळला. वनविभागाला याची माहिती मिळाल्यावर पंचनामा करण्यात आला. वाघाचा मृत्यू नैसर्गिक कारणांनी झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे मात्र शवविच्छेदनानंतरच नेमके कारण समजेल असं सूत्रांनी सांगितलं.

//<><><><><>//